शिक्षक - विद्यार्थी आंतरक्रिया

डॉ. एस. एस. सोनुने.
सहा.प्रा.शिक्षणशास्त्र विद्याशाखा
शैक्षणिक पात्रता- एम.ए.,एम.एड.
यचममु वि.नाशिक-४२२२२२

श्री.बाळासाहेब विनायक धायगुडे
(एम.ए.मराठी,एम.एड.)

प्रस्तावना-आंतरक्रिया करणे याला आपण संप्रेषण असे म्हणतो. आंतरक्रिया या शब्दाचा अर्थ फक्त शाब्दिक बोलण्याची क्रिया व त्यावरील प्रतिक्रिया इतकीच मर्यादित नाही. आंतरक्रिया ह्या शब्दांच्या पलिकडे चेह-यावरील विविध हावभाव, हास्य, राग, आवड-निवड, खाणाखुणा, तंत्रज्ञान यांच्या माध्यमातून होतांना पाहतो. त्याला आपण अशाब्दिक आंतरक्रिया असे म्हणतो. आज आपण तंत्रज्ञानाचा वापर देखील मोठ्या प्रमाणात आंतरक्रिया करण्यासाठी करतो आहे. आंतरक्रिया करणे हे समाजशीलतेचे लक्षण आहे. समाजात राहतांना व्यक्तीला आंतरक्रिया करावीच लागते. आंतरक्रियेतून व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचा विकास होतो. आंतरक्रिया ही दोन प्रकारची असते,स्वत:शी होणारी आंतरक्रिया व इतरांशी होणारी आंतरक्रिया. स्वत:शी होणारी आंतरक्रिया ही व्यक्तीला 'स्व' ची ओळख करून देण्यास मदत करते त्यामुळे स्वत:तील गुण-दोष कळतात. आपण त्याला आत्मपरीक्षण असे म्हणतो. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे वैयक्तीक आंतक्रियेतून व्यक्तीला स्वत:च्या क्षमता कळतात, व्यक्तीला स्वत:च्या दिशा ठरविता येतात. इतरांशी होणा-या आंतरक्रियेमुळे त्या व्यक्तीची वेगळी प्रतिमा समाजात तयार होते,त्यातुन व्यक्तीला विकासाचे नवे मार्ग सापडतात. जशी आपण इतरांशी आंतरक्रिया करतो, तशाच प्रकारच्या प्रतिक्रिया समोरच्या व्यक्तीकडून आपल्याला मिळत असतात.

बालकाच्या संस्कारक्षम वयात होणा-या आंतरक्रिया, ह्या बालकाच्या आयुष्याची जणू तयारीच करतात. कारण या बालवयातच त्यांच्या भाषिक कौशल्यांचा विकास होत असतो. त्यांच्या सवयी आकार घेतात व त्यांच्यावर संस्कार होतात.त्यामुळे बालवयातील आंतरक्रिया ह्या अत्यंत महत्वाच्या आहे. जशे शब्द त्याच्या कानावर पडतात, किंवा जशी आपल्या ओठांची हालचाल होते, त्याच प्रमाणे बालकाचा भाषिक विकास होत असतो.

शिक्षण व आंतरक्रिया-

शिक्षणाच्या प्रक्रियेतील शिक्षक व विद्यार्थी हे दोन ध्रुव आहेत. त्यातील विद्यार्थी हा केंद्रबिंदू आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास शिक्षणातून होणे गरजेचे आहे. लहान निरागस बालक हे त्याच्या आई - वडिलांना व घरातील सर्वांना असंख्य प्रश्न विचारत असते. त्याला पडणारे प्रश्न हे जरी मोठ्यांना महत्वाचे वाटत नसले, तरी त्याच्या व्यक्तीमत्वाच्या विकासासाठी ते महत्वाचे असतात. ब-याचदा आपण त्याच्या प्रश्नाचे उत्तर देतो. परंतू कधीतरी म्हणतो, काय रे तुझ सारख प्रश्न विचारण ? त्याला टोकतो. अशा प्रकारच्या मोठ्यांच्या वागण्यांन ते बालक अबोल व्हायला लागत. बालक अबोल झाल्यावर आपण पुन्हा म्हणतो, हल्ली न तो किंवा ती फारच अबोल झालीय वा झालाय. वास्तविक पाहता त्याला आपणच अबोल बनवित असतो . त्याच्या व्यक्तीमत्व विकासाची गति कमी होण्यास येथूनच सुरू होते.प्रश्न विचारणे हे ज्ञान मिळविण्याचे माध्यम आहे.त्यामुळे मुलांनीप्रश्न विचारले तर त्या प्रश्नाला उत्तर देणे आवश्यक आहे.यातुनच त्या मुलांचेत्या मुलांचेशिक्षण होत असते.

शिक्षक- विद्यार्थी आंतरक्रियेचे स्वरूप-

शिक्षणाचे महत्वाचे कार्य म्हणजे मुलांना बोलते करणे हे आहे. म्हणूनच साने गुरूजी म्हणतात, शिक्षण म्हणजे बाहेरचे ज्ञान बालकांच्या डोक्यात कोंबण्याची प्रक्रिया नव्हे, तर बालकातील सुप्त गुणांना बाहेर काढण्याची प्रक्रिया आहे". शिक्षणाने मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला पाहिजे. मुलांना मोकळेपणाने बोलता आले पाहिजे. ठामपणे आपले मत मांडता आले पाहिजे. बालकामधील सामाजिक जाणीवा वाढायला पाहिजे.त्याचा भावनिक विकास व्हायला पाहिजे.त्यासाठीअध्यापकाने अध्ययनार्थी शीआशयाला पोषक व विषयाला अनुस्वरून आवश्यक त्या प्रमाणात आंतरक्रिया करावी. पुस्तकी आंतरक्रियेतून केवळ परिक्षार्थी तयार होतील. परंतू नितीमूल्यांचे शिक्षण केवळ पुस्तकातून धडे वाचून मिळत नाही, ते व्यक्तीश:किंवा सांघिकरीत्या आंतरक्रियेच्या अनुभवातूनअंगी येते. त्यामुळे अध्यापकाने विद्यार्थ्यांशी आंतरक्रिया करतांना शाब्दिक आंतरक्रिये बरोबर अशाब्दिक आंतरक्रियेचा वापर करावा. कारण शब्द ह्या एकाच माध्यमांचा वापर अध्यापनात आंतरक्रियेसाठी केल्यास अध्यायनार्थी कंटाळतात.म.गांधीजीनीं सांगितल्या प्रमाणे शिक्षणातून व्यक्तीच्या हात, हृदय, डोके यांचा विकास झाला पाहिजे,

म्हणजेच कृतीशिलता, भावना ,विचारक्षमतेचा विकास झाला पाहिजे. त्यासाठी अध्यापकाने अध्यापनात वयोगटानुसार विविध अध्यापन पध्दतींचा वापर करावा, त्यात प्रकल्प, निरीक्षण, चर्चा, गटचर्चा, सांघिक अध्यापन, प्रयोग, आधार पध्दती, प्रश्न पध्दती, कथन, कथाकथन पध्दती, सहल पध्दती, क्रिडा पध्दती, नाटयीकरण पध्दती, संवाद पध्दती,व्याख्यान पध्दती, ज्ञानरचनावाद आदी सारख्या विविध पध्दती व तंत्रे, तत्वे यांच्या सोबत तंत्रज्ञानाचा व शैक्षणिक साधनांचा यांचा वापर करावा. फ्लॅ डर्सलाघर्गातील शिक्षक विद्यार्थी आंतरक्रियेत शिक्षकच वर्गात ७० % बोलतात असे दिसून आले.मात्र आजच्या शिक्षणपध्दतीचा विचार केला असता त्या यात आमुलाग्र बदल झालेला दिसून येतो. आज शिक्षण हक्क कायदा, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पध्दतीच्या आकारीक व साकारीक पध्दतीने विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करतांना आंतरक्रियेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यमापन करणे सोपे होते. त्यातुन विद्यार्थ्यांच्या आवडी-निवडी कळतात, विद्यार्थ्यांची मनस्थितीं समजते व समस्या समजण्यास मदत होते.

विद्यार्थ्यांशी आंतरक्रिया करतांना शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या नावाने ओळखल्यास मुलांनाखुप अभिमानाचे व कौतुकाचे वाटते. त्यातुन शाळेविषयी व शिक्षणाविषयी ओढ निर्माण होते.विद्यार्थ्यांशी आंतरक्रिया करतांना शब्दांची योजना ही अध्यापकाने काळजीपूर्वक करावी. कारण शब्दांनीच पेटतात घरे, दारे आणि शस्त्रे, यत्ने करू || तर संत कबीर शब्दांन बद्दल म्हणतात, शब्द-शब्द हर कोई कहे | शब्द के हात न पाव | एक शब्द करे घाव | दु जाशब्द करे उपाय ||

शिक्षकाने आपल्या मुलांना प्रभावी आंतरक्रियेसाठी तयार करतांना शाळेत विविध उपक्रम राबविले पाहिजे. **उदा** - शिक्षणाची जत्रा भरविली पाहिजे. त्यात नाट्यप्रसंग, स्पर्धा, खेळ, वेगवेगळ्या प्रयोगाचे आयोजन केले पाहिजे, ज्यातून विविध शाळेतील विद्यार्थी त्यात सहभागी होतील व त्यांच्यात आंतरक्रिया घडवून आणता येईल. विद्यार्थी आनंदाने आपल्या कलाकृतीचे सादरीकरण करतात. शाळेच्या भिंती बोलक्या कराव्यात व मुलांनीस्वत त्या चालता फिरता वाचाव्यात या देखील आंतरक्रिया होते. शिवाय मुलांनास्वत:च्या कल्पना व्यक्त करण्यासाठी भितीवर जागा असावी. मातीच्या वस्तू, चित्रे, साहित्य कविता यांना त्यात स्थान दिले पाहिजे. ज्यातून मुलांच्या सृजनात्मक कौशल्यांचा विकास होईल.विद्यार्थ्यांचे अवधान वर्गात टिकून ठेवण्यासाठी शैक्षणिक साधनांचा,तंत्रज्ञानाचा व कृतींचा वापर अध्यापनकाने त्याच्या ४० ते ४५ मिनीटांच्या अध्यापनात केल्यास अध्ययनार्थी चेप्रभावी अध्ययन घडून येते. विद्यार्थीकेंद्री शिक्षण पध्दतीत विद्यार्थ्याला जास्तीत-जास्त बोलण्यासाठी अध्यापकाने संधी देऊन, बोलते करणे हे विद्यार्थ्यांतील सुप्त गुण विकसित करण्यासाठी महत्वाचे आहे. ज्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास विकसित होण्यास मदत होईल. खेळ हे लहानापासून मोठ्यांपर्यंन्त सर्वांनाच आवडतात. त्यामुळे क्रिडन पध्दतीचा वापर देखील अध्यापकाने आपल्या अध्यापनात करावा.

शिक्षक व विद्यार्थ्यांच्या चांगल्या आंतरक्रियेतून विद्यार्थांच्या ताण-तणावाचे व्यवस्थापन होते. आशय व विषयाला पोषक आंतरक्रियेतून शिक्षणाची प्रक्रिया ही आनंददायी बनते.विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्ती शक्तीचा विकास होतो. शिवाय शिक्षणाचा जीवनाशी समन्वय कसा साधावा हे लक्षात येते. भाषिक समृध्दी बरोबरच भाषेचे बारकावे लक्षात येतात. विद्यार्थी-विद्यार्थी आंतरीक संबंध दृढ होण्यास मदत होते. चांगल्या आंतरक्रियेतून व्यक्तीचा भावनिक विकास घडून येऊ शकतो. विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तींचा विकास होतो.

विद्यार्थ्यांशी आंतरक्रिया साधतांना घ्यावयाच्या दक्षता –

अध्यापकाने अध्यापन करतांना सर्व वर्गाला उद्देशून आंतरक्रिया कराव्यात. जेणे करून वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना वाटते की, अध्यापक आपल्याशीच आंतरक्रिया करीत आहे. अध्यापकाने अध्ययनार्थी च्याअध्ययनास पोषक ठरतील अशा आशय व विषयानुसार बाबींवर आंतरक्रिया कराव्या. त्यामुळे विद्यार्थ्यांचे ज्ञानभंडार समृध्द होते.आंतरक्रियेतून विद्यार्थ्यांतील विविध चांगल्या बाबी सर्व वर्गासमोर जाहीरपणे मांडाव्यात, पण विद्यार्थ्यांच्या वैयक्तीक चुका मात्र एकट्यालाच सांगाव्यात. अर्थात कौतूक सर्वांसमोर करावे व चुका मात्र एकांन्तात सांगाव्या .वर्गात आंतरक्रिया करतांना विद्यार्थ्यांच्या उत्तराकडे दूर्लक्षकरू नये.

समारोप-

शिक्षण ही द्विमार्गी प्रक्रिया आहे, विद्यार्थी हा त्यातील केंद्रबिंदू आहे. अध्यापक -विद्यार्थी यांच्यातील आंतरक्रिया ही विषय व आशयाला अनुस्वरून असल्यास त्यातुन विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास घडून येतो. विद्यार्थी केवळ पाठांतर न करता, तो त्याचे मत, विचार चांगल्या प्रकारे व्यक्त करू शकतो. शिवाय व्यक्तीगत आंतरक्रियेतूनविद्यार्थ्याला त्याच्या व्यक्तीमत्वातील गुण-दोष कळतात. आत्मविश्वास निर्माण झाल्यामुळे तो निर्णय योग्य घेऊ शकतो. त्यामुळे शिक्षक- विद्यार्थी आंतरक्रिया ही विद्यार्थी विकासासाठी मौल्यवान असा घटक आहे. त्यामुळे शिक्षकाने विद्यार्थ्याला जास्तीत जास्त बोलते करावे. त्याच्या विविध गुणांचा विकास करण्यासाठी आंतरक्रियेत विविधता आणावी. शिवाय आंतरक्रिया ही एकमार्गी न ठेवता, विद्यार्थ्याला आंतरक्रिया करण्यासाठी जास्तीत जास्त संधी द्याव्यात.

संदर्भ-

1) जगताप, ह. ना.(1994).प्रगत शैक्षणिक तंत्रविज्ञान.नुतन प्रकाशन पुणे.
2) पानसे, रमेश,(2006). शिक्षण : आनंदक्षण. पुणे, महाराष्ट्र: ग्रंथाली प्रकाशन.
3) दुनाखे, अरविंद,(2004). शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन आणि समुपदेशन: पुणे, महाराष्ट्र: नूतन प्रकाशन.
4) शेवतेकर-बडवे , शारदा, (2004). विकासाचे व अध्ययनाचे मानसशास्त्र. नागपूर, विद्या प्रकाशन .
5) नागतोडे, किरण, (2006). अध्ययन कर्त्याचा विकास व अध्यापन-अध्ययन क्रियेचे मानसशास्त्र.नागपूर, विद्या प्रकाशन.
6) दुनाखे, अरविंद , (2007). उदयोन्मुख भारतातील समाज, शिक्षण व शिक्षक.पुणे,नित्य नुतन प्रकाशन.